# रमा माधवाच्या भावस्पर्शी नात्याचा वेध : स्वामी

**डॉ. प्रांजली बा.निमसटकर (मोरस्कर)**
महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर
Mob.No. : ९३७२७१७६३६
Email - Pranjalimoraskar@gmail.com

---

**प्रस्तावना :**

मराठी वाचकांमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेला कादंबरी हा साहित्यप्रकार आहे. साहित्य म्हणजे जीवनानुभवांचे प्रकटीकरण होय. कादंबरी हा एक दीर्घ कथनात्मक साहित्यप्रकार आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात कादंबरी हा साहित्यप्रकार आधुनिक मानला जातो. या साहित्यप्रकारात मानवी जीवनाचे संपुर्ण वर्णन केले गेलेले असते. मानवी जीवनातील व्यक्ती आणि समाजाचे अनेकविध प्रश्न विविध घटनेतून मांडलेले असतात. कादंबरी हया ऐतिहासिक कादंबरी प्रकारामध्ये वास्तव व त्यावेळचा काळ महत्त्वाचा असतो. ऐतिहासिक कादंबरीचे वास्तव हे ऐतिहासिकच असते. यात भूतकाळीन जीवन व वातावरण साकारण्याचा प्रयत्न असतो. इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी यात फरक असतो. ऐतिहासिक कादंबरीला ऐतिहासिक गोष्ट म्हणता येत नाही, कारण त्यात कल्पित रुप असते. कल्पितरुप हे ऐतिहासिक वास्तवाशी सुसंगत असले पाहिजे.ऐतिहासिक कादंबरीकडे पाहता 'स्वामी' कादंबरीतील काल्पिनिक पात्रे, ऐतिहासिक घटनांशी सुसंगत वाटतात

१९६२ साली प्रकाशित झालेली रणजित देसाई यांची स्वामी ही ऐतिहासिक कादंबरी असून तिच्या २००१ पर्यंत बावीस आवृत्त्या निघाल्या यावरून या कादंबरीची लोकप्रियता ध्यानात येते. या कादंबरीचा साहित्य अकादमीनेही पुरस्कार देऊन गौरव केला आहे. रणजित देसाई स्वामीविषयी बोलताना तिस-या आवृत्तीच्या निमित्ताने या मथळ्याखाली पुस्तकाला जोडलेल्या मनोगतात म्हणतात, स्वामीसाठी इतिहासाचा अभ्यास करीत असताना अनेकवेळा असे वाटायचे की, " मी ह्या पेशव्यांचे कुठले तरी पूर्वजन्मीचे देणे आहे. म्हणून मी हे कष्ट घेतो आहे. स्वामीचे वाचकांनी जे कौतुक केले ते पाहता असे वाटते, की मी ह्या थोर पेशव्यांचे देणे दयायचे नव्हते त्यांनीच माझे काहीतरी देणे दयायचे शिल्लक होते. ते देणे ते देताहेत. बोलून चालून राजाचे देणे। ते पेलणे माझ्यासारख्या सामान्यांला कसे शक्य आहे."

**कादंबरीचा आशय :**

रणजीत देसाई यांची "स्वामी" हीकादंबरी रमा माधवरावांच्या जीवनाचे चित्र रेखाटणारी आहे. एकीकडे माधवरावांचे कर्तृत्व आणि त्या कर्तृत्वाच्या मागे असलेले रमाबाईंचे पाठबळ तर दुसरीकडे त्यांचे सुखी आयुष्य कुरतडणारे कौटुंबिक कलह दिसून येतात. त्यांचे चुलते माधवराव आणि आनंदीबाई यांच्या कूटकारस्थानांमुळे त्यांच्या आयुष्यात असंख्य अटीतटीचे प्रसंग येतात आणि ते सोडविण्यात व त्यांची उकल करण्यातच माधवरावांची फार मोठी शक्ती खर्च होते. एकदा माधवराव राघोबादादांना त्यांच्या कारवायांना वैतागून म्हणतात, 'जी ताकद शत्रूच्या बीमोडासाठी खर्च पडावी, तीच ताकद आज आप्तस्वकीयांना कैदेत टाकण्यात आम्हाला खर्ची पाडावी

Research Hub International Journal

लागते आहे. निजामासारखे पिढीजात शत्रू आमचे मित्र बनू शकले. पण पितृतुल्य काका मला उमजू शकले नाहीत. यापेक्षा आमचा पराभव तो कोणता? आपल्या घरातील दुफळी कोणत्या तोंडानं जगजाहीर करू ? (पृष्ठ क्र.२८६-२८७) राघोबादादांच्या अशा कूटकारस्थानांमुळे त्यांना राजकीय व इतर क्षेत्रातही होणारा त्रास, लढायांसाठी चाललेली धवपळ अशा विविध प्रकारच्या ताणामुळे त्यांना क्षयासारखा दुर्धर आजार झाला आणि तो त्यांचे शरीर सतत पोखरत राहिला व शेवटी अतिशय कमी वयातच त्या क्षयाने त्यांचा बळी घेतला. आत्यंतिक टोकाचा कौटुंबिक कलह आणि त्यामुळे कुटुंबाची आणि राज्याची होणारी वाताहत याचे अतिशय हृदयस्पर्शी चित्र या कादंबरीत त्यांनी रेखाटले आहे.

पेशवेपदाची जबाबदारी माधवरावावर सोळाव्या वर्षी आली. अशा अवस्थेत राघोबादादांनी त्यांना मदत करणे तर दूरच पण कर्नाटकच्या मोहिमेत सारी जबाबदारी त्यांच्यावर टाकून काका परत फिरले. माधवरावांनी मोहीम फत्ते केली त्यावेळी राघोबादादांनी त्यांचे कौतुक तर दूरच पण निजाम भोसल्यांशी हातमिळवणी करून त्यांच्या विरुध्द ठाकले. घोडनदीच्या पात्रात अचानक तुटून पडले. माधवरावांची दुर्दशा केली. लढाईत पराकमाने मिळवलेला मुलुख निजामाला देऊन त्याच्याशी मैत्री घडवून आणली. राज्याच्या लोभासाठी इंग्रजांशी हात मिळवणी केली. या संदर्भात खंत व्यक्त करताना माधवराव म्हणतात, "हैदरच्या पराभवापेक्षाही दुसरं मोठं यश आम्हाला मिळालं असं वाटलं. आमच्या घरचं वैर मिटलं. ह्याचं मोल आम्ही फार समजलो. पण "(पृ. २८९) अशा प्रकारचा सततचा मनस्ताप माधवरावांच्या वाट्याला येत होता. एकदा माधवराव मोहीमेवर जायला निघाले असताना रमाबाई नेत्रातील अश्रूना बांध घालत त्यांना निरोप देतात तेव्हा त्यांना समजावून सांगताना ते म्हणतात, "परकीयांशी हातमिळवणी करून राज्य उलथण्याचे स्वप्न काका पहात आहेत. आमचा नाईलाज आहे." (पृ.२७९) या सततच्या मनस्तापाने त्यांचेशरीर क्षीण होत गेले आणि ते अंथरूणाला खिळले. या अवस्थेतील त्यांच्या अतिशय संवेदनशील मनातील भवबंध अतिशय तरल आणि पारदर्शकतेने रेखाटण्यात देसाई यशस्वी झाले आहेत. कादंबरीतील अशा प्रकारचे संवाद आणि प्रसंग वाचकाच्या अंतरंगाचा ठाव घेतात आणि वाचकाचे अंतःकरण पिळवटून निघाल्याशिवाय राहत नाही. माधवरावांच्या कारकीर्दीतील न्यायव्यवस्थेच्या संदर्भात सांगायचे झाल्यास रामशास्त्री आणि माधवरावांच्या संवादातून ते अधिक स्पष्ट होते. ज्यांच्या ताब्यात राज्याच्या संपूर्ण आरमाराची जबाबदारी होती ते माधवरावांचे मानाचे सेनापती लेले यांना रामशास्त्रींनी दोषी ठरवून दंड ठोठावला. त्यावेळी माधवरांनी त्या प्रकरणाची शहानिशा करून ते रामशास्त्रींना म्हणाले, "शास्त्रीबुवा, आपल्या न्यायनिवाड्यात आम्ही ढवळाढवळ करणार नाही. ह्याची खात्री बाळगा. प्रत्यक्ष पेशवे जरी काही प्रसंगानं आपल्यासमोर अपराधी होऊन उभे राहिले तरी त्यावेळीदेखील आपल्या मनातील न्यायदेवतेचे स्थान ढळू देऊ नका त्याप्रसंगी आपली जिव्हा कठोर न्याय देण्यात कचरू नये ही आमची आपल्याकडून अपेक्षा आहे. "(176-180) या वाक्यातून माधवरावाची न्यायव्यवस्थेसंबधीची भूमिका स्पष्ट होते.

इंग्रज अधिकारी मॉस्टिन माधवरावांना भेटायला येतो आणि हैदरचा पराभव करण्यासाठी दारूगोळा न्यायला मालवण आणि रायरीवरून त्यांची गलबत नेण्याचा मार्ग मोकळा करून दयावा अशी मागणी करतो तेव्हा माधवराव अतिशय परखड शब्दात त्याला उत्तर देतात. ते म्हणतात “आमचे शत्रू कोण? निजाम? उत्तरेचा बादशहा ? दक्षिणेतला हैदर त्यापैकी कोणीही विजयी झाले तरी ते आमचेच आहेत. भारतीय आहेत. त्यांचा करण्यासाठी तुमच्यासारख्या परकीयांची मदत कशी घेणार? व्यापारासाठी तुम्ही आलात आणि एवढ्यातच ताजवा फेकून

Research Hub International Journal

तलवार हाती घेतलीत. साहेब तुमची ही दोस्ती ना एक दिवस आमच्या देशाला भारी किंमत दद्यायला लावणारी आहे." (पृ.२७५) अशा अनेक प्रसंगातून माधवरावांचे कर्तुत्व व स्वभाव दिसून येतो.

रमा माधवांचं प्रेम हा या कादंबरीचा गाभाच वाटतो त्यांच्या भावनिक संबंधाचे अनेक धागे आणि त्या धाग्यांची सुंदर वीण कादंबरीच्या पानापानावर विणलेली दिसते. उदा. "ज्या ज्या ठिकाणी मी काही सुंदर पाहतो. तिथं तिथं तुझी उत्कटतेनं आठवण येते. त्याकरिता एवढं भव्य आणि दिव्य पहावं लागतं असं नाही. चैत्रातील पालवलेली चिंच पाहिली तरी तू उभी ठाकतेस. भर उन्हाळ्यात आकाशातून कापूस पिंजत जाणारा एकाकी मेघ जरी पाहिला तरी तुझ्या आठवणीनं जीव व्याकुळ होतो. तुझी आठवण केव्हा केव्हा येते हे टिपून ठेवायचं झालं, तर आयुष्यात दुसरे क्षण सापडायचेच नाहीत" (पृ.३१९) या प्रसंगातून माधवरावांच्या रमाबाईवरील प्रेमाची कल्पना येते. रमाबाईंबरोबर ते सारीपाट खेळत. असेच एकदा खेळत असताना रमाबाई माधवरावांना म्हणाल्या, "सारं जिंकण्याची सवय असणा-या माणसाला खेळातलीसुध्दा हार चालत नाही." तेव्हा माधवराव म्हणतात, "ते आपल्याला आज समजायचं नाही. केव्हा तरी कळेल. आम्ही सारीपाटात विजय मिळविलाच तरी हरू.पण हरलो तर मात्र जिंकूत्यामुळेच हा डाव अवघड होऊन बसलाय करा तुमच्या दानाने सुरवात." (पृ.१८३) अशा एकमेकात गुंतलेल्या दोन जीवांच्या ताटातुटीचा विचारही वाचकाला असह्य होतो आणि वाचकाचे हृदय पिळवटून निघते. राघोबादादांमुळे रमाबाईंना अनेकदा आपल्या भावनांना मुरव घालावी लागली. त्यांनी माधवरावांनाच त्रास दिला असे नव्हे तर रमाबाईनाही छळण्यात कुठलीच कसूर केली नाही. एकदा माधवराव कर्नाटकाच्या स्वारीवर गेले असताना कुठला तरी सण होता आणि जेवण झाल्यावर रमाबाईंना विडा खायची बुध्दी झाली. पानं संपली होती. तेव्हा नानांकडे त्यांनी पानं मागायला पाठवले त्यावेळी नानांकडून निरोप आला, "इकडे स्वारीवर जाण झालं असता पान खाणं योग्य नव्हे." (प्र.१४२) रमाबाईनी त्या दिवसापासून एकटीने पान खाणं सोडून दिलं. येईपर्यंत जरीवस्त्रे वापरू नयेत पाठविला होता. तेव्हा रमाबाई चौदा पंधरा वर्षाच्या होत्या. त्यांनी नानांना बोलावणे पाठवून बोलावून घेतले आणि म्हणाल्या, "नाना आम्ही तुमच्या मालकीण, या घराचे शिष्टाचार तुमच्यापेक्षा आम्ही अधिक जाणतो. पेशव्यांच्या घरचे कुळाचार तुमच्याकडून शिकण्याची अजून आमच्यावर पाळी आलेली नाही. खुद्द पेशवे जरी स्वारीवर गेले असले तरी त्यांच्या घरी आकस्मित आलेली पाहुणेमंडळी आपल्या घरी जाताना मानसन्मानाने गेली पाहिजेत ते पाहणं आमचं कर्तव्य आहे. समजलं " (पृ.१४५) रमाबाईनी अशा कणखर शब्दात त्यांना खडसावलं. त्यांचा हा कणखरपणा पाहिल्यावर गोपिकाबाई त्यांना म्हणतात, "तुझ्या पायानं साक्षात लक्ष्मी माझ्या घरात आली आहे. (पृ.१४५) रमाबाई मात्र अशा अनेक प्रसंगाना मोठ्या धीर गंभीरतेने सामोरे जात होत्या.माधवरावांचे आजारपण वाढतच होते. तशा रमाबाई चिंतीत होत होत्या. त्यांची व्याकुळता पाहून माधवराव दुःखी होत आणि त्यांना परोपरीने समजावण्याचा प्रयत्न करीत. एकदा रमाबाई अतिशय चिंताग्रस्त अवस्थेत त्यांच्याजवळ बसलेल्या असताना त्यांना ते जीवनाचा अर्थ पटवून देतात त्यावेळचे रमाबाईंना पटवून देणारे त्यांचे जीवनाविषयीचे विचार असे आहेत.ते म्हणतात, "रमा जीवन किती वर्ष जगला त्याला फारसा अर्थ नाही. जीवन कसं जगला याला महत्व आहे. नाही तर चंदनाचं नावही राहिलं नसतं. सा यांनी वटवृक्षाचं कौतुक केलं असतं. जो आनंद चंदनाच्या माथी लिहिला आहे तोच मी उपभोगतो आहे. खरंच रमा भी सुखी आहे तृप्त आहे. दारी आलेल्या मुत्युचं मी स्वागत करायला तयार आहे. त्याचं मला भय वाटत नाही." (पृ.क. २६६) माधवराव स्वतःच्या जीवनाबद्यल असा विचार करतात पण रमाबाईंचं काय? रमाबाईंचे तर ते स्वामी होते. तिचे अधर्धाग होते. तिच्या जीवाची घालमेल कुणाला

समजणे शक्य नव्हते. ज्यांची ती सावली होऊन राहिली होती. हिला सोडून जाणार अशी चिन्हे दिसत होती. त्यांचे वैवाहिक जीवन आणि त्यांचे भावविश्व घरातील वडीलधा यांनी कूटकारस्थाने करून कुरतडून टाकले होते. राजकीय दगदग आणि कौटुंबिक हेवेदावे यातून सुटून माधवराण चौरनिदेच्या तयारीला लागले होते. रमाबाई मात्र मूक होत्या. सखोल विचारांती त्यांनी सती जाण्याचा निर्णय घेतला आणि त्याही आपल्या तयारीला लागल्या मात्र शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी कुणालाही या गोष्टीचा पत्ता लागू दिला नाही. माधवरावांच्या सोबत जाण्याची त्यांचीही तयारी सुरू होती. सती प्राण्याकरिता लागणारे वस्त्र त्यांनी आपल्या विश्वासातल्या व्यक्तीकडून मागवून घेतले होते. शेवटी माधवरावांनी जगाचा निरोप घेतला आणि रमाबाई श्यांची सावली होऊन त्यांच्याबरोबर सती गेल्या. कादंबरीतील हा प्रसंग अतिशय हृदयद्रावक उतरला आहे. हृदय पिळवटून टाकणारा हा प्रसंग कादंबरी वाचतानाच नव्हे तर कादंबरी वाचल्यावरही बराच काळपर्यंत अंतःकरणात घर करून राहतो.

कादंबरीत निसर्गाची सुंदर वर्णने आहेत. उदा. माधवराव रमाबाईंना म्हणतात ती जागा फार सुंदर आहे प्रशस्त घाट आहे. या घाटाच्या जरा वरच्या बाजूला काळ्या फतरांनी रेखत गेलेला नदीकाठ डोळ्यात भरतो नदीच्या पात्रावरून वा याबरोबर सळसळत येणा-या लाटा मनाचे तरंग उठवतात. नदीच्या दोन्ही बाजूंना पसरलेले विस्तीर्ण मळे आणि वरचे निळेमोर आकाश मनाला भुरळ घालते." (पृ.३३) यासारखी निसर्गवर्णनांची कादंबरीभर पखरण असून,

काय उणे तुम्हांपाशी मी तो अल्पची संतोषी
तुका म्हणे देवा देवा, प्रेमे भातुके पाठवा (पृ. ३६४)

अशा अभंगाचीही पेरणी कादंबरीत असल्याचे जाणवते. इतकेच नव्हे तर पिठासारखं चांदणं (पृ.319) अशा प्रतिमा व प्रतीकांची रेलचेल कादंबरीत असल्याचे जाणवते. कादंबरी वाचताना तिच्यात नाटयात्मकता असल्याचा अनेकदा प्रत्यय येतो. उदा. "दबल्या आवाजात एकमेकांशी बोलण्यात सरदार मंडळी गर्क असताना मनसदीच्या डाव्या बाजूला असलेल्या पडदयांची हालचाल झाली. क्षणात दरबारात स्तब्धता पसरली. त्याचवेळी भालदार-चोपदारांनी दिलेली ललकारीने सा-यांच्या नजरा प्रवेशव्दाराकडे लागल्या. सारा दरबार खाड्ङ्कन उभा राहिला. आणि श्रीमंत बाबुराव पेशवेदरबारात प्रवेश करते झाले. क्षणात सा. यांच्या नजरा झुकल्या. चोपदार पुकारत होता "आस्ते कदम महाराज ! नजर बर्दम होशियार " (पृ.०३) या आणि अशा अनेक प्रसंगामधून एक प्रकारचे नाट्य निर्माण होऊन ते प्रसंग हुबेहुब दृष्टीपुढे उभे राहतात.आणि ऐतिहासिक काळात वाचकाला फिरवून आणतात. त्यामुळे तत्कालीन ऐतिहासिक प्रसंग, दाखले, वातावरण, घडामोडी इत्यादींची कळत नकळत जाण होऊन इतिहासाचे ज्ञान होते व इतिहासाविषयी गोडी निर्माण होऊन वाचकाला इतिहासातील बारकावे जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण होते. कादंबरीतील उठावदार व्यक्तिरेखाटनामुळे माधवराव पेशवेंची कारकीर्द आणि पेशवाईची वाचकाला कल्पना येते आणि वाचक देशाच्या भूतकाळात म्हणजेच इतिहासात जाऊन वर्तमानकालीन राजकीयच नव्हे तर सामाजिक प्रश्नांचा विचार करण्यास प्रवृत्त होतो आणि भविष्याचे आडाखे बांधण्यास तयार होतो. ठसठशीत आणि हुबेहुब व्यक्तिरेखाटनामुळे तत्कालीन व्यक्तिमत्वे जसे रमाबाई, माधवराव, आनंदीबाई, रघुनाथराव त्यांच्या सेवेत असणारे दासदासी, दरबारी माणसे, त्यांच्या काम करण्याच्या पध्दती, त्यांच्या वागण्या - बोलण्याच्या पध्दती इत्यादींचा जिवंतपणा नजरेत भरतो. त्यांच्या तोंडी दिलेल्या संवादांमुळे तत्कालीन व्यवहार व कामकाजाचीही वाचकाला जाण



Research Hub International Journal

होण्यास मदत होते.

**निष्कर्ष :**

रघुनाथराव व आनंदीबाईसारख्या व्यक्ती कुटुंबालाच नव्हे तर समाजाला आणि देशालाही किती घातक ठरू शकतात याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे स्वामी ही कादंबरी होय असे म्हटल्यास वावगे ठरू नये. कुटुंबातील वडीलधा यांचा लहानांना खरे तर आधार वाटतो. त्यांच्याविषयी त्यांना याच गोष्टीमुळे आदर वाटतो. वडीलधा यांनी आपल्या अनुभवसंपन्नतेने पुढच्या पिढीकरिता मार्गदर्शक बनावे व प्रसंगी त्यांच्यावर येऊ घातलेले जीवघेणे वार स्वतःवर घ्यावे ही भारतीय संस्कृती आहे. रघुनाथरावांनी मात्र ही गौरवशाली संस्कृती आणि परंपरा बाजूला ठेवून स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी स्वतःला, कुटुंबाला, समाजाला आणि भारताच्या स्वातंत्र्यालाच धोक्यात घातले. त्याचे दुष्परिणाम अनेक वर्षेपर्यंत देशाला सोसावे लागले ही बाबही नाकारून चालणार नाही. या दृष्टिकोनातून विचार केल्यास स्वामी ही कादंबरी वाचकाला जणू या गोष्टीची जाणीव करून देते की वैयक्तिक स्वार्थाच्या मागे लागताना त्यामुळे कुणाला हानी तर पोहचणार नाही ना?याची जाण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. रघुनाथराव या व्यतिरेखेव्दारे ते हा मोलाचा संदेश अखिल मानवजातीला देताना दिसतात. म्हणूनच एक उत्कृष्ट ऐतिहासिक कादंबरी म्हणून स्वामीचे यश उल्लेखनीय आणि लक्षणीय स्वरूपाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


- चंद्रकांत बांदिवडेकर मराठी कादंबरी, चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिकेशन्स, द्वि.आ. पुणे १९९६,
- हरिश्चिंद्र थोरात कांदबरी एक साहित्यप्रकार, शब्द पब्लिकेशन्स, मुंबई - २०१०
- देसाई रणजित - स्वामी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2001, बाविसावी आवृत्ती


Research Hub International Journal